# पॅनोरमा

चित्रगीत

अनिरुद्ध भातखंडे
aniruddha.bhatkhande@expressindia.com




आपल्याकडे जे नसतं, तेच नेमकं हवं असतं, त्याचंच आपल्याला अधिक आकर्षण असतं, हा जगाचा नियम आहे, संगीत क्षेत्रही याला अपवाद नाही. येथील तरुणाईला पाश्चात्त्य संगीताचे (?) मोठे आकर्षण, तर तिकडे शास्त्रीय संगीतावर संशोधन! यातूनच कदाचित फ्यूजन हा प्रकार जन्माला आला असावा. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत आणि पाश्चिमात्य तालप्रकार यांचा सुंदर मिलाप साधणारा 'पॅनोरमा' हा नवीन अल्बम याचंच एक उदाहरण ठरावे.

पं. विनायक काळे आणि डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे धडे गिरवलेल्या अनिता कुलकर्णी या प्रतिभावान व गुणी गायिकेने या अल्बमची संकल्पना आणली असून त्यातील सर्व म्हणजे आठही रचना त्यांनीच गायल्या आहेत. आपल्या शास्त्रीय संगीताची श्रीमंती जगावेगळी आहे. कोणता राग कोणत्या ऋतूत अथवा दिवसाच्या कोणत्या प्रहरात गावा, याचे काही नियम आहेत. त्यानुसार हे राग गायल्यास वा ऐकल्यास अपूर्व आनंद मिळतो. या अल्बममध्ये नेमक्या याच गोष्टीवर भर देण्यात आला आहे. या आठ रचना विविध रागांवर आधारित असून त्या-त्या रागांमधून होणारी रसनिर्मिती कानसेनांना सुखावून जाते. फ्यूजनच्या नावाखाली रागांच्या नियमांची मोडतोड करण्याचा प्रकार आजकाल सर्रास चालतो. यात मात्र प्रत्येक रागाचे बलस्थान असणाऱ्या तीव्र, कोमल स्वरांना जराही धक्का लावलेला नाही, हे विशेष.

'जा रे बलमा तोसो नही बोलू' या बागेश्री रागातील रचनेने या अल्बमची सुरुवात होते. सतार, बासरी आदी वाद्यांच्या लांबलचक वाद्यमेळानंतर गायिकेचा आवाज कानी पडतो. अनिता कुलकर्णी यांची शास्त्रीय बैठक पक्की असल्याचं जाणवतं, शिवाय त्यांचा आवाजही कमालीचा गोड असल्याने हे सादरीकरण आनंददायी ठरतं. यानंतरचं 'जा रे जा रे जा' ही भिन्न षड्ज रागातील रचनाही तितक्याच प्रभावीपणे सादर करण्यात आली आहे. या अल्बममधील सर्वात श्रवणीय रचना आहे ती मल्हार रागातील. 'सकल धन गगन पवन चलत पुरवाई रे' ही रचना डोळे मिटून ऐकल्यास वर्षा ऋतूचे कल्पनाचित्र क्षणार्धात डोळ्यांसमोर साकारते. अतिशय द्रुत लयीतील ही रचना या गायिकेने समर्थपणे गायली आहे. बासरी, संतूर, सतार, तबला ही वाद्ये आणि सहगायिका यांच्या एकत्रित परिणामामुळे मल्हारची वातावरणनिर्मिती सहजपणे होते. 'जा जा रे जा पथिकवा' (मधुकंस) आणि 'पायलिया बाजे' (जनसंमोहिनी) या अप्रतिम रचनांमुळे या अल्बमचा आलेख उंचावतो.

हंसध्वनी या उत्फुल्ल रागाची महती 'तनोम दिर दिर' या रचनेत विशद होते. ही रचना अतिशय प्रसन्न, प्रफुल्लित आणि मनाला ताजंतवानं करणारी आहे, यात शंका नाही. 'सुपनवा मे आओ ना हरी' (चारुकेशी) आणि 'दिर दिर तनोम' (परमेश्वरी) या उत्तम रचनांनी या अल्बमची सांगता होते. आठ वेगवेगळ्या रागांचं सौंदर्य उलगडण्यात अनिता कुलकर्णी निश्चितच यशस्वी ठरल्या आहेत. यात त्यांना मोलाची साथ मिळाली आहे ती हर्षद कानेटकर यांची. एकलवादन, साथ-संगत आणि नृत्यांगनांना साथ करणे या सर्व प्रकारांवर प्रभुत्व असणाऱ्या या अष्टपैलू तबलापटूने या अल्बममध्ये बहार उडवून दिली आहे. अमेय अत्रे आणि राजू दूरकर या साथीदारांसह त्यांनी विविध ताल प्रकार हाताळून या रचनांना फ्यूजनचा साज चढवला आहे. या सर्व रचनांचा वाद्यमेळही कानेटकर यांनीच केदार परांजपे यांच्या साथीने साधला आहे. प्रत्येक रागाची रसनिर्मिती करण्यात या सुसंगत वाद्यमेळाने मोठा वाटा उचलला आहे. संदीप कुलकर्णी (बासरी), रवी चारी (सतार) आणि डॉ. धनंजय दैठणकर (संतूर) या वादकांनीही चोख कामगिरी बजावली आहे. कीर्ती, दीपिका आणि भाग्यश्री या सहगायिकांना फार वाव नसला तरी त्यांची साथ पूरक आहे.

या अल्बममध्ये भैरवीतील रचनेचा समावेश नसल्याने त्याचा आणखी एक श्रवणीय भाग लवकरच ऐकण्यास मिळेल, अशी आशा करण्यास हरकत नाही!